CENTRE FOR DISTANCE EDUCATION
SNDT Women's University
Sir Vithaldas Vidyavihar, Juhu Tara Road,
Santacruz (W), Mumbai - 400 049. INDIA.

NAAC ACCREDITED

दूरस्थ शिक्षण केंद्र,
श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठ
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा मार्ग,
सांताक्रुज (प.), मुंबई - ४०० ०४९, भारत.

Tel.: 91-22-26609829 / 26607758 / 26608193 / 26608176 • E-mail : cde@sndt.ac.in • Website : www.cde.sndt.ac.in

CDE /22/२०२२-२०२३/174

२२ जुलै २०२२

# खासगी व्यक्ती आणि संस्थानी विद्यापीठाचे नाव आणि लोगो (बोधचिन्ह) वापरण्यावर प्रतिबंध

'दूरस्थ शिक्षण केंद्र' श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की अनेक खासगी व्यक्ती आणि संस्था 'दूरस्थ शिक्षण केंद्र' आणि 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' यांचे नाव आणि लोगो (बोधचिन्ह) वापरून लेटरहेड तयार करत आहेत. तसेच युट्युब, व्हाट्सअँप समूह, टेलिग्राम चॅनल अशा समाज माध्यमातून विद्यापीठाबाबतची आणि दूरस्थ शिक्षण केंद्राविषयी दिशाभूल करणारी माहिती अनधिकृतपणे खासगीरित्या प्रसारीत करत आहेत. **'दूरस्थ शिक्षण केंद्र' आणि श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे नाव आणि लोगो (बोधचिन्ह) पूर्वपरवानगी अथवा संमती शिवाय वापरणे बेकायदेशीर आहे.**

सर्व संबधितांना कळविण्यात येत आहे की, 'दूरस्थ शिक्षण केंद्र' आणि 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' यांचे नाव आणि लोगो (बोधचिन्ह) याचा वापर असलेले लेटरहेड, युट्युब चॅनल, व्हाट्सअँप समूह, टेलिग्राम चॅनल त्वरित बंद करावयाचे आहेत. भविष्यात असे प्रकार निदर्शनास आल्यास असे प्रकार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. स्मृति भोसले)

संचालक